**MHNS190025632023**

| | | |
|---|---|---|
| खटला दाखल दिनांक | - | २२/१२/२०२३ |
| खटला नोंदणी दिनांक | - | २२/१२/२०२३ |
| खटला निकाल दिनांक | - | १०/०३/२०२६ |
| निकालाची अवधी | - | व. म. दि.<br>०२ ०२ १६ |

| | |
|---|---|
| | **येवला येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**<br>**(पिठासिन अधिकारी डी. एम. गुलाटी)**<br>**नियमित फौजदारी खटला क्र.३१७/२०२३ नि.क्र. २१** |
| | (प्रथम खबर I-४२५/२०२३, भा.द.वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे |
| फिर्यादी | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फतः ठाणे अंमलदार,<br>येवला शहर पोलीस स्टेशन, येवला,<br>जि. नाशिक. |
| तर्फे | विव्दान विधिज्ञ श्री. एस.एस.भाटे |
| आरोपी | **शुभम संदीप गायकवाड**<br>वय – २० वर्षे, धंदा - मजुरी<br>रा. कोटमगांव खुर्द, ता. येवला,<br>जि. नाशिक. |
| तर्फे | विव्दान विधिज्ञ श्री. आर.डब्ल्यु. गायकवाड. |

| | | |
|---|---|---|
| घटना घडल्याची तारीख | : | १४.११.२०२३ |
| प्रथम खबर दिनांक | : | १६.११.२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची दिनांक | : | २२.१२.२०२३ |
| न्यायालयाने दोषारोप निश्चित केल्याची दिनांक | : | ०१.१०.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची दिनांक | : | ०१.१०.२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची दिनांक | : | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | | १०.०३.२०२६ |

## आरोपींचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची दिनांक | जामिनावर मुक्तता केल्याची तारीख | गुन्हयाची कलमे | आरोपीस शिक्षा करण्यात आली | देण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | किंवा निर्दोष ठरविण्य ात आले | | संपरिक्षे दरम्यान आरोपीने कारागृहात घालविलेला कालावधी |
| १. | **शुभम संदीप गायकवाड** | सी.आर.पी.सी. ४१(१)(अ) प्रमाणे नोटीस दिली. | -- | भा.द. वि चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे | निर्दोष | --- | --- |

**अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार -**

| **क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| १. | संदीप विठठल गायकवाड | १० | फिर्यादी |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार -**

| **क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**क) न्यायालयीन साक्षीदार -**

| क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन कागदपत्रांची यादी व निशाण्या**

**अ) अभियोगपक्ष -**

| **क्र.** | **दस्तऐवजाचा तपशिल** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | फिर्याद | निरंक |
| २. | घटनास्थळ पंचनामा | १२ |
| ३. | जप्ती पंचनामा | १३ |
| ४. | मुददेमाल पावती | १४ |
| ५. | वैदयकीय प्रमाणपत्र | १५ |
| ६. | समजपत्र | १६ |
| ७. | पोचपावती | १७ |
| ८. | सुचनापत्र | १८ |

**ब) बचावपक्ष -**

| **क्र.** | **दस्तऐवजाचा तपशिल** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| | निरंक | |

**क) न्यायालयीन दस्तऐवज -**

| **क्र.** | **दस्तऐवजाचा तपशिल** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| | निरंक | |

**ड) जप्त मुद्देमाल -**

| **क्र.** | **वस्तुंचा तपशिल** | **आर्टीकल क्र.** |
|---|---|---|
| १ | एक अडीच फुट लांबीचा कु-हाडीचा लाकडी दांडा | (एम.आर.क्र.२६४/२०२३) |

## <u>न्यायनिर्णय</u>

**(निकाल तारीख १० मार्च, २०२६)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले आहेत.

**<u>अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे आहे</u>-**

२. घटना ही दि.१४/११/२०२३ रोजी फिर्यादी सायंकाळी ०५.३० वाजेच्या सुमारास फिर्यादी त्याचे घरी असतांना त्यांचा मुलगा शुभम हा पलंगावर पडलेला होता. तेव्हा त्यांचे घरातील बल्ब ते लावण्याकरीता पंलगावर चढले असता तेव्हा त्यांचा मुलगा शुभम त्यांना म्हणाला की, त्याचे कपडे खराब होतील असे म्हणाला, तेव्हा त्यांनी त्यास

तुझे कपडे खराब झाले तर माझे कपडे घाल असे म्हणाले असता त्यास त्याचा राग आल्याने त्याने त्यांना शिवीगाळ केली व तेवहा फिर्यादी त्याला समजावुन सांगत असतांना त्याने पलंगावरुन उठुन घरातील डिशची केबल काढुन त्यांचे गळयावर पाठीवर मारहाण केली. तसेच हाताचे बुक्क्यांनी तोंडावर मारहाण केली. तसेच तेथे असलेली कु-हाडीचे दांडयाने डोक्यात, तोंडावर, पायावर हातावर दांडयाने मारहाण केली. त्यांचेकडे घराचे सर्व कागदपत्र असुन तुला घरातुन हुसकावुन दईल असा दम दिला व त्यांचा मोबईलचे सीम घेवुन गेला. त्यानंतर त्यांना मार लागला असल्याने ते येवला शहर पोलीस स्टेशनला आले असता पोलीसांनी त्यांना औषधोपचाराची यादी दिल्याने ते सरकारी दवाखाना येवला येथे औषधोपचचार घेवुन आरोपीविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली.

३. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने येवला शहर पोलीस स्टेशन, येवला, ता. येवला, जि. नाशिक येथे गु.र.नं.I-४२५/२०२३, भा.द.वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हयाची आरोपीं विरुध्द नोंद झाली. तपासिक अंमलदार अंकुश हेंबाडे यांनी त्यांचे तपासाअंती आरोपीं विरुध्द पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले.

४. दोषारोपपत्राचे तथा दस्तऐवजाचे अवलोकन करुन नि.क्र.०७ अन्वये आरोपीविरुध्द कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दोषारोप निश्चित केला, ज्याअर्थी आरोपीने गुन्हयास नाकबुली नि.क्र. ०६ अन्वये दर्शविली व संपरिक्षेची मागणी केली.

५. आरोपीं विरुध्द गुन्हयात गोवणारा पुरावा नसल्याने त्याचे कलम ३१३(१) (ब) फौजदारी प्रक्रिया संहिता प्रमाणेचे बयान वगळण्यात आले.

६. अभियोगपक्ष व आरोपीपक्षाचा युक्तीवाद ऐकला व अभिलेखाचे अवलोकन केले असता, न्यायनिर्णयाकरिता खालील मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह देत आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | दिनांक १४.११.२०२३ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेच्या सुमारास कोटमगाव खु., ता. येवला, जि. नाशिक येथे फिर्यादीचे राहते घरी आरोपीने फिर्यादीस कु-हाडीचे दांडयाने, डिशचे केबल जे की मृत्युस कारणीभुत होईल या हत्याराने मारहाण करुन | **नाही.** |

दुखापत केल्याचे व त्यायोगे भा.द.वि. कलम ३२४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय?

| | | |
|---|---|---|
| ०२. | वरील तारखेस, वेळी, ठिकाणी आरोपीने फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन दुखापत केल्याचे व त्यायोगे भा.द.वि कलम ३२३ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ०३. | वरील तारखेस, वेळी, ठिकाणी आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन अपमानीत केल्याचे व दुसरा गुन्हा करण्याकरीता अथवा सार्वजनीक शांतता भंग होणे करीता त्यांना प्रक्षोभित केल्याचे आणि त्यायोगे भा.द.वि. कलम ५०४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ०४. | वरील तारखेस, वेळी, ठिकाणी आरोपीने फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिल्याचे व त्यायोगे भा.द.वि. कलम ५०६ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ०५. | आदेश काय? | **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

**- <u>का र ण मि मां सा</u> -**

**<u>मुद्दा क्र. १ ते ४ करीता</u> :-**

७. मुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकांशी संलग्नीत असल्याने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांना एकत्र चर्चेस घेत आहे.

८. या प्रकरणात अभियोग पक्षाने एक साक्षीदार तपासले. संदीप विठठल गायकवाड हे फिर्यादी आहे. संदीप विठठल गायकवाड (सा.क्र.१) यांनी त्यांच्या साक्षीत असे सांगितले आहे की, ते आरोपीला ओळखतात. घटना कुठे, केव्हा व कधी घडली हे त्यांना आठवत नाही. असे घडले नाही की, आरोपीने त्यांना लाकडी दांडयाने मारहाण केली होती. साक्षीदाराने त्यांच्या साक्षीमध्ये, घटनेच्या दिवशी ते बल्ब बसविण्याकरीता पलंगावर चढले असता आरोपीचे कपडे खराब झाले व त्याचा राग आल्याने आरोपीने

फिर्यादीस शिवीगाळ करुन कु-हाडीच्या दांडयाने, डिशच्या केबलने व हाता बुक्क्याने मारहाण केली याबाबत काही सांगितले नाही. म्हणुन घटनेच्या दिवशी आरोपीने फिर्यादीस कपडे खराब झाल्याचे कारणावरुन कु-हाडीच्या दांडयाने, डिशच्या केबलने व हाता बुक्क्याने मारहाण केली याबाबत काही सांगितले नाही. म्हणुन आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे. म्हणुन मी **मुददा क्र.१ ते ४** चे उत्तर नकारार्थी नोंदविते व **मुददा क्र. ५** करीता खालील आदेश पारित करते.

## आदेश

१. **आरोपी नामे शुभम संदीप गायकवाड** यांना भारतीय दंड विधान, १८६० मधील कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ नुसार जामीन ची पुर्तता करावी.

३. आरोपीचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात यावे.

४. सदर गुन्हयातील मुद्देमाल अडीच फुट लांबीचा कु-हाडीचा लाकडी दांडा हा मुल्यहीन असल्याने अपिल कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावे.

DEEPIKAKAUR MANMOHANSINGH GULATI
Digitally signed by DEEPIKAKAUR MANMOHANSINGH GULATI
Date: 2026.03.14 17:37:46 +0530

**स्थळ :- येवला.** **(डी.एम.गुलाटी)**
**दिनांक :-१०.०३.२०२६** **न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, येवला**
**जि. नाशिक.**